# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र.जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/०५/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- ०४/०१/२०१९


## "खुनाच्या गुन्हयात आरोपीस सात वर्ष कारावास व द्रंव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे पालांदुर :– अंतर्गत मौजा विहीरगाव (कन्हाळया). येथील आरोपी नामे ज्ञानेश्वर पंढरी फुंडे वय ४३ वर्ष रा. विहीरगाव याने चंद्रहास ज्ञानेश्वर फुंडे वय १९ वर्ष यास गळा आवळुन जिवानीशी ठार केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने आज दिनांक ०३/०१/२०१९ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश वर्ग १ श्री. आर.पी. पांडे सा.यांनी आरोपीस सात वर्ष कारावास व १०,०००/–रू. द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक २४/०८/१४ ला तक्रारदार प्रल्हाद मारोती कोचे वय ५६ वर्ष पोलीस पाटील रा. विहीरगाव (कन्हाळया). यांनी पोलीस ठाणे पालांदुर येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, दिनांक २५.०८.२०१४ रोजी रात्री ०२.०० सुमारास मी आपले घरी झोपलो असता तेव्हा त्याचा गावचा ज्ञानेश्वर पंढरी फुंडे व त्याचा लहाण भाउ विजय पंढरी फुंडे हे दोघेही येवुन फिर्यादीला सांगितले की, मुलगा चंद्रहास ज्ञानेश्वर फुंडे वय १९ वर्ष हा दिनांक २४/०८/२०१४ ला सायंकाळी ०६:०० वा. सुमारास दारू पिवुन घरी आला.व मला एक लाख रूपये दे. नाहीतर तुम्हाला मारतो असे बोलुन भांडण करू लागला व रात्रीस ११:०० वाजता घरावर चढुन त्याने घराचे कवेलु फोडले व घरावरून खाली उतरून घरात आला. व पंढरी लक्ष्मण फुंडे यांचे डोळयाजवळ,नाकाजवळ मारहान केले.म्हनुन आरोपीला त्याचा राग आला म्हनुन आरोपीने मुलगा चंद्रहास ज्ञानेश्वर फुंडे वय १९ वर्ष यास खाली पाडले व त्याचे छातीवर,नाकावर प्रथम बुक्यानी मारहान केले.नंतर आरोपीने त्याचे हातातील नॉयलान दोरीने चंद्रहासचे गळयाला आवळुन घट्ट करून त्याचा जीव घेतला असे खबरेवरून आरोपी विरूध्द् अपराध क्रमांक ३१/१४ कलम ३०२ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास सहायक पोलीस निरीक्षक एच.एम.सैय्यद यांनी करून आरोपी नामे ज्ञानेश्वर पंढरी फुंडे वय ४३ वर्ष रा. विहीरगाव जि. भंडारा यास अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३०२ भा.द.वी अन्वये आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस. क्र. ६५/१४ अन्वये अतिरीक्त सत्र न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करिता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री, विनोद भोले जिल्हा सरकारी अभियोक्ता**,सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ०३.०९.२०१९ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी** ज्ञानेश्वर पंढरी फुंडे वय ४३ वर्ष रा. विहीरगाव **जि.** भंडारा यांचेविरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०४ (II), भादवि अन्वये** सात वर्ष कारावास व १०,०००/–रु. दंड, दंड न भरल्यास सहा महिण्याची शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक अंबादास सुनगार ठाणेदार पालांदुर यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक एच.एम.सैय्यद तपासी अधिकारी म्हणुन तर सहायक फौजदार भोजराम भलावी पो.स्टे. पालांदुर यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रातप्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.